


# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक १९४, शनिवार १३ एप्रिल २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# हक्काच्या पाट पाण्यासाठी लढा उभा करु

## ■ नीलेश लंके यांची श्रीगोंदे तालुक्यात ग्वाही ■ तुमच्या प्रश्नासाठी दिल्लीत रस्ता रोको करणारा खासदार दिसेल ■ श्रीगोंदे तालुक्यातही लंके यांच्या यात्रेला उदंड प्रतिसाद



■ स्वाभिमान जनसंवाद यात्रेच्या बाराव्या दिवशी नीलेश लंके यांनी श्रीगोंदे तालुक्यातील जनतेशी संवाद साधला.

**श्रीगोंदे : विशेष प्रतिनिधी**

**कुकडी कालव्याचे पाणी सोलापूरपर्यंत सोडले जाते. आमच्या लोकांना मात्र पाणी, पाणी करावे लागते. समोरून पाणी जात असताना पाणी पाहण्याशिवाय पर्याय नसतो. आपण शेतकऱ्यांना पाणी मिळवून देण्यासाठी संघर्ष करू. शेतकरी सुखी झाला तर सगळे सुखी होतील. शेतीच्या पाण्याबाबत तुम्ही काळजी करू नका. आपण पाण्यासाठी लढा उभा करू अशी ग्वाही देत तुमच्या प्रश्नांसाठी दिल्लीत रस्ता रोको करणारा खासदार तुम्हाला दिसेल असे नीलेश लंके यांनी सांगितले.**

गेल्या ११ दिवसांपासून सुरू असलेली नीलेश लंके यांची स्वाभीमान जनसंवाद यात्रा शुक्रवारी श्रीगोंदे तालुक्यात पोहचली. पहिल्या दिवसांपासून नागरीकांकडून मिळणारा उस्फुर्त प्रतिसाद शुक्रवारीही श्रीगोंदे तालुक्यात पहावयास मिळाला.

यावेळी बोलताना लंके म्हणाले, तुम्हाला आजपर्यंत चुकीचे अनुभव आले. माझ्या बाबतीत असे होणार नाही. मी काम करणारा माणूस आहे.

### लोक संघटीत, परिवर्तन अटळ

**आपला देश क्रांतीकारकांचा देश आहे. ज्या ज्या वेळी लोक संघटीत होतात त्यावेळी परिवर्तन अटळ असते. स्वातंत्र्यपूर्व काळात घराघरात स्वातंत्र्य सैनिक तयार झाले आणि त्यांनी इंग्रजांसाठी चले जावचा नारा दिला. आज लोकसभेची निवडणूक जनतेने हाती घेतली आहे. तुम्ही एकदा माझ्यावर विश्वास ठेवा मी तुम्हाला अभिमान वाटेल असे काम करून दाखविल अशी ग्वाही लंके यांनी यावेळी दिली.**

निवडणूका आल्या की गावात यायचे, मोठ-मोठया गप्पा मारायच्या, त्यानंतर परत गावाकडे फिरकायचेच नाही असा कार्यकर्ता मी नाही. जनतेने संधी दिल्यानंतर त्याचा उपयोग सर्वसामान्यांच्या हितासाठी, गावाच्या विकासासाठी झाला पाहिजे. सन २०१९ ला ज्यांना तुम्ही खासदार म्हणून निवडून दिले ते तुमच्या गावातही आले नाहीत, काम तर दुरच. गावाचा विकास हे लोकप्रतिनिधीचे काम असते. खासदार म्हणून तुम्ही लोकसभेत जाता तुम्ही पाच वर्षात तुम्ही शेतकऱ्याचा एकही प्रश्न लोकसभेत उपस्थित केला नाही. खोटे बोलायचे व रेटून बोलायचे असा यांचा फंडा असल्याची टीका लंके यांनी खा. विखे यांचे नाव न घेता केली.

यावेळी मा. आ. राहुल जगताप, बाबासाहेब भोस, घनश्याम शेलार, साजन पाचपुते, प्रशांत दरेकर, टिळक भोस, मनोहर पोटे, संतोष खेतमाळीस, बाळासाहेब दुतारे, बाळासाहेब उगले, प्रा. संजय लाकूडझोडे, आपचे राजेंद्र नागवडे. सिमतल वाबळे आदींसह यावेळी मोठ्या संख्येने नागरिक यावेळी उपस्थित होते.

### निर्यातबंदी उठली नाही, मते मागायला जाणार का ?

**खाजगी कामानिमित्त विखे पिता पुत्र गृहमंत्री अमित शहा यांना भेटले. बाहेर आल्यानंतर सांगितले की कांदा निर्यातबंदी उठविण्यासाठी भेट घेतली. नगर, श्रीगोंदे बाजार समितीमध्ये निर्यातबंदी उठविली म्हणून सत्कारही घेतले. निर्यातबदी उठविली नसती तर मी मते मागायला गेलो नसतो असेही त्यांनी जाहिर केले. कांदा निर्यातबंदी उठली नसल्याचे संबंधित अधिकाऱ्याने जाहिर केल्याने आता ते कोणत्या तोंडाने मते मागायला जाणार आहेत असा सवाल लंके यांनी केला.**

### निळवंडे, ताजनापुर, साकळाईचे आश्वासन फोल

**राहुरी तालुक्यात निळवंडे, शेवगांव तालुक्यात ताजनापुर योजना, नगर- श्रीगोंदे तालुक्यासाठी वरदान ठरणाऱ्या साकळाई योजना पुर्ण केल्या नाही तर मते मागायला येणार नाही असे सन २०१९ मध्ये खासदारांनी सांगितले होते. आज लोक डाळ साखर वाटण्यापेक्षा काम काय केले हा प्रश्न विचारत असल्याचे लंके म्हणाले.**

# नगरच्या ईदगाह मैदानावर फडकविला पॅलेसस्टाईनचा झेंडा

## ■ घटनेची सखोल चौकशी करून सुत्रधार शोधा ■ पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची मागणी

**नगर : प्रतिनिधी**

**रमजान ईद सणाच्या पार्श्वभूमीवर नगर शहरात ईदगाह मैदानावर पॅलेसस्टाईनचा झेंडा फडविण्यात आल्याची घटना अतिशय गंभीर असून, या प्रकाराची सखोल चौकशी करून, घटनेमागील खरे सुत्रधार पोलिसांनी शोधून काढण्याची आवश्यकता असल्याचे महसूल तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सांगितले.**



मंत्री विखे पाटील यांनी या घटनेचा तिव्र शब्दात निषेध करून राज्यात व जिल्हयात रमजान ईदचा सण उत्साहात साजरा होत असताना काही अपप्रवृत्तीनी गालबोट लावण्याच्या हेतूने प्रार्थनेच्या दरम्यान पॅलेस्टाईनचा झेंडा फडकविला. ही अतिशय गंभीर बाब आहे. या बाबत पोलिसांनी तातडीने दखल घेवून गुन्हा दाखल केला असला तरी, या घटनेमागील खरे सुत्राधार शोधून काढणे अतिशय गरजेचे असल्याचे पालकमंत्री म्हणाले.

या गंभीर घटनेच्या तपासात कोणताही हलगर्जीपणा न करता पोलीस प्रशासनाने झेंडा फडकविणारे आणि त्यांना पाठबळ देणारे सुत्रधार कोण आहेत याची कसून चौकशी करावी. कारण अशी देशद्रोही वृत्ती कार्यरत असेल तर, प्रशासनाने ती मुळापासून उखडून टाकण्याची गरज आहे. अशा देशद्रोही वृत्तीला कोणीही आश्रय देण्याची चुक करु नये असे आवाहन पालकमंत्र्यांनी केले आहे.

दुर्दैवाने काही राजकीय पक्ष आपल्या जाहिरनाम्यातच फुटरतावादी वृत्तीला प्रोत्साहन देत आहे. पण अशा घडणाऱ्या घटनांमधून आत्मपरिक्षण करण्याची आवश्यकता असल्याचे मत ना.विखे पाटील यांनी शेवटी व्यक्त केले.

# विखे-आठवले वाद उफाळला !



**शिर्डी** लोकसभा मतदारसंघाची जागा आरपीआय आठवले गटाला सोडू नये अशी भूमिका राज्याचे महसूलमंत्री राधाकृष्ण विखे यांनी महायुतीचे नेते, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे केली होती. त्यामुळे मला शिर्डीची उमेदवारी मिळू शकली नाही असा गौप्यस्फोट केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनीच महाराष्ट्र टाइम्स ऑनलाईनच्या कार्यक्रमातील संवादात नुकताच केला. विखे विरोधात धनगर समाजाने बेल भंडारा उधळून यापूर्वी बहिष्काराचा इशारा दिला होता. धनगर समाजातील विखे विरोध निवळण्यासाठीच राज्यमंत्री मंडळाने आचारसंहिता लागू होण्यापूर्वीच्या शेवटच्या बैठकीत अहमदनगर जिल्हयाचे नामांतर पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर नगर करण्याचा निर्णय घेतला होता.

फडणवीसांनी धनगर समाज जोडण्यासाठीच विखे-मा. मंत्री प्रा. राम शिंदे मनोमिलन घडवून आणण्याचा प्रयत्न केला. राजकीय वर्तुळात माधव पॅटर्नची विखे विरोधी धग कमी होत नाही तोच केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी विखे विरोधात गौप्यस्फोट केल्याने मागासवर्गीय मतदारांमध्ये मोठया प्रमाणावर चलबिचल होऊ शकते. त्याचे पडसाद राज्याच्या राजकारणावर उमटू शकतात. नगर जिल्हयातील दक्षिण आणि उत्तर मतदारसंघात त्याची तिव्रता अधिक असू शकते. त्यात महायुतीचे दक्षिण नगर लोकसभा मतदारसंघात महायुतीचे भाजचे उमेदवार डॉ. सुजय विखे आहेत. विखे यांची ही उमेदवारी लक्षात घेऊनच केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी नेमकेपणाने मुहूर्त साधत विखेंचा पोलखोल केला. विखे-आठवले वादाला अनेक कंगोरे असून त्याला २०१४ ची शिर्डी लोकसभा मतदारसंघाची निवडणूक कारणीभूत ठरते. पंढरपूरचा पांडूरंग केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांना पावला.




त्या मतदारसंघातून ते दोन वेळा खासदार झाले. पण त्यानंतर शिर्डी लोकसभा मतदारसंघ आरक्षित झाल्यावर रामदास आठवले यांनी तिथे उमेदवारी केली. मात्र त्या निवडणूकीत त्यांचा दारूण पराभव झाला. त्यांना पंढरपूर पावले पण शिर्डीने नाकारले. आठवले यांच्या या पराभवाला माजी खासदार बाळासाहेब विखे हे जबाबदार होते असा उघड दोषारोप रामदास आठवले यांनी केला होता. गेल्या दहा वर्षात प्रवरा आणि गोदावरीच्या पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले असले तरी विखे-आठवले वादावर पडदा न पडता त्याच्या राजकिय खपल्या पुन्हा उकरून काढल्या जात आहेत, हीच बाब मंत्री विखेंचे पत्र आणि त्याबाबत केंद्रीय मंत्री आठवले यांनी केलेला गौप्यस्फोट अधोरेखित होतो.

महादेव जानकर यांच्या रासपला महायुती परभणीची लोकसभेची जागा सोडते. त्यांच्या समाजापेक्षा अधिक मतदार असलेल्या आंबेडकरी चळवळीचे प्रतिनिधीत्व करत असलेल्या केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांना शिर्डीची उमेदवारी नाकारली जाते याचे राजकीय शल्य आहेच. त्यात विखे यांनी भाजपा नेते देवेंद्र फडणवीस यांना पत्र देऊन जुनी राजकीय जखम अधिक चिघळवली. केंद्रीय मंत्री रामदास आठवले गेली एक दिड वर्षे शिर्डीत वेळोवेळी पक्षाचे मेळावे घेऊन आणि पत्रकार परिषदा घेत या मतदार संघातून उमेदवारी करणारच असे ठामपणे सांगत होते. त्यांनी केवळ शिर्डीतच नव्हे तर देशपातळीवर सुध्दा आठवले या मतदारसंघातून उमेदवारी करणारच असा प्रचार करत होते. त्यांचे हे राजकीय स्वप्न विखे यांच्या पत्रामुळे भंगले. त्यात शिर्डीचे आरक्षण पुढच्या सार्वत्रिक निवडणूकीत राहणार नाही. परिणामी रामदास आठवले यांना यापुढे शिर्डीतून खासदार होणे राजकीयदृष्टया अशक्यप्राय दिसते. आठवलेंची शिर्डीची संधी आता नाही तर यापुढे कधीच नाही. त्यांचे हे राजकीय शल्य उफाळून आले असल्याने त्याचा परिणाम शिर्डीपेक्षा अहमदनगर दक्षिण लोकसभा मतदारसंघावर होऊ शकतो. कारण या मतदारसंघातून खा. डॉ. सुजय विखे हे उमेदवार आहेत. विखे विरोधाचे उट्टे आठवले कसे आणि कितपत काढतात हे आता लवकरच स्पष्ट होईल, घोडा मैदान फार दुर नाही.

### विखे-आठवले वादाला अनेक कंगोरे

**त्याला २०१४ च्या लोकसभा निवडणूकीतील शिर्डीतील रामदास आठवले यांच्या पराभवाची पार्श्वभुमी आणि पराभवाला दंगल कारणीभूत ठरते. २०१३-१४ च्या दरम्यान प्रवरा परिसरातील हनुमंतगाव येथे सवर्ण विरूध्द दलित असा वाद उफाळून आला. त्यातून दंगल झाली. त्यात मोठया प्रमाणावर विखे समर्थक असल्याची वंदता होती. त्यांना विखे पाटील पाठीशी घालत होते. असा आरपीआय पक्षाचा आक्षेप होता. त्याचा परिणाम २०१४ च्या लोकसभा निवडणूकीवर होऊन आठवले पराभूत झाले. पंढरपूरला आठवले खासदार असताना किती ॲट्रासिटीच्या केसेस झाल्या याची आकडेवारी पुढे करून प्रचंड विरोध झाला. त्या पराभवाचे खापर खा. बाळासाहेब विखे यांच्यावर फोडले गेले. त्याला शरद पवार आणि दादासाहेब रूपवते यांनी राजकीय हवा दिल्याने विखे यांच्यामुळेच आठवले पराभूत झाले असे राजकीय वातावरण तयार झाले. त्यावेळी विखे यांच्या विरोधात पक्षांतर्गत कारवाईची मागणी झाली होती. हा पूर्व इतिहास दुर्लक्षित करून चालता येणार नाही. आता विखे-आठवले वाद नव्याने उफाळून आलेला दिसतो. याचा दलित व्होट बँकेवर परिणाम संभवतो.**

# मटण, आमरसाच्या जेवणावळींची धुम !

## नगर दक्षिण लोकसभा मतदार संघात महिनाभर आधीच मतदारांची चांदी



**नगर : प्रतिनिधी**

**नगर दक्षिण मतदारसंघात विद्यमान खासदार डॉ. सुजय विखे व पारनेरचे मावळते आमदार नीलेश लंके यांच्यात हायहोल्टेज लढत होणार असल्याचे संकेत मिळत असून मतदानास महिना शिल्लक असतानाच मतदारांसाठी मटण, आमरसाच्या जेवणावळींची धुम सुरू झाली आहे.**

नीलेश लंके यांनी स्वाभिमान जनसंवाद यात्रेच्या माध्यमातून संपूर्ण मतदारसंघ पिंजून काढला असून यात्रेदरम्यान त्यांना गावागावांमधून मोठा प्रतिसाद मिळत आहे. यात्रेत सहभागी होणाऱ्या कार्यकर्त्यांना स्थानिक पदाधिकारी जेवणाची व्यवस्था करीत आहेत. या यात्रेस मिळणाऱ्या प्रतिसादामुळे नियोजीत वेळापत्रकात बदल करून ही यात्रा आणही काही दिवस चालणार असल्याचे सांगण्यात आले.

दुसरीकडे खा. डॉ. सुजय विखे यांनी नगर शहर तसेच पारनेर-नगर मतदारसंघावर लक्ष केंद्रीत केले असून विविध ठिकाणी आयोजित करण्यात आलेल्या सभांना उपस्थित नागरीकांसाठी खास मेजवाणीचे आयोजन करण्यात येत आहे. मांसाहारी नागरीकांसाठी मटण, भाकर, बिर्याणी तर शाकाहारी नागरीकांसाठी आमरस चपातीचा बेत करण्यात येत आहे.

गेल्या दोन उर्वरीत पान ३ वर

# दिड वर्षाच्या चिमुकलीचा बिबट्याच्या हल्ल्यात दुर्दैवी मृत्यू

## ■ जुन्नर तालुक्यातील घटना ■ मृत चिमुरडी तालुक्यातील धोत्रे गावची ■ नीलेश लंके यांच्या पाठपुराव्यानंतर कुटूंबाला २५ लाखांची तात्काळ मदत

**जुन्नर : प्रतिनिधी**

**जुन्नर तालुक्यातील शिरोली खुर्द येथे गुरूवारी पहाटे पाच वाजण्याच्या सुमारास बिबटयाने मेंढपाळांच्या वाडयावर हल्ला करीत दिड वर्षाच्या चिमुरडीस उचलून नेले. बिबटयाने केलेल्या हल्ल्यात या चिमुरडीचा दुर्दैवी मृत्यू झाला. दरम्यान या घटनेची माहीती मिळाल्यानंतर नीलेश लंके यांनी पहाटेच जुन्नरमधील वन विभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क करून घटनास्थळी रवाना केले. या कुटूंबास आर्थिक मदत देण्यासंदर्भातही त्यांनी सुचना दिल्या. त्यानुसार या कुटूंबाला तात्काळ आर्थिक मदतही मिळाली आहे.**

संजय कोळेकर, त्यांची पत्नी तसेच दिड वर्षांची मुलगी संस्कृती व वृध्द आई सध्या मेंढयांसह शिरोली ता. जुन्नर येथे वास्तव्यास होते. गुरूवारी पहाटे त्यांच्या वाडयावर बिबटयाने हल्ला करीत पालातील संस्कृती हिस उचलून नेले. पालामध्ये संस्कृती नसल्याचे लक्षात आल्यानंतर संजय कोळेकर व त्यांच्या कुटूंबियांनी परीसरात पाहणी केली असता काही अंतरावर संस्कृतीचा हात आढळून आला. पुढे तिचा मृतदेह आढळ्यानंतर




■ तालुक्यातील धोत्रे येथील दिड वर्षाची चिमुरडी बिबटयाच्या हल्ल्यात मृत्यूमुखी पडल्याने दीपक लंके, राजू रोडे, बापूसाहेब शिर्के यांनी घटनास्थळी जात कोळेकर कुटूंबास मदतीचा हात दिला.

### लंके यांचे बंधू घटनास्थळी

**नीलेश लंके हे जनसंवाद यात्रेत व्यस्त असल्याने त्यांनी या घटनेची माहीती त्यांचे बंधू दीपक लंके तसेच सहकारी उपसरपंच राजू रोडे, बाजार समितीचे उपसभापती बापूसाहेब शिर्के यांना दिली. तात्काळ घटनास्थळी पोहचून कोळेकर कुटूंबास आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी कागदपत्रांची पुर्तता करण्याच्या सुचना दिल्या. दीपक लंके यांच्यासह रोडे, शिर्के यांनी घटनास्थळी जात आवष्यक कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर वन विभागाच्या वतीने कोळेकर यांच्या खात्यावर तात्काळ १५ लाख रूपये वर्ग करण्यात आले. उर्वरीत दहा लाख रूपये दोन दिवसांत आदा करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.**

# युवा

# ...तर पुढे धोका आहे!



**असं म्हणतात की जोड्या या स्वर्गातच बनतात. जो जोडीदार आपल्या नशिबात लिहिलेला असतो तोच आपल्याला मिळतो. ही गोष्ट जरी खरी असली तरी स्वत:साठी जोडीदार कसा निवडावा हे सुद्धा आपल्या हातातच असतं. अनेक व्यक्ती अशा असतात ज्यांना इतरांच्या दबावाखाली लग्न करावं लागतं, मात्र अशा अनेक व्यक्ती असतात ज्यांना जोडीदार निवडण्याची सुवर्णसंधी मिळते. अशीच संधी जर तुम्हाला मिळाली तर त्याचं नक्की सोनं करा. खास करून तरुणींनी या दृष्टीने गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. कारण त्या आपल्या घरातल्या व्यक्तींना सोडून दुसऱ्याच्या घरात जातात. अशावेळी आपण ज्या व्यक्तीची निवड करतो आहोत तो खरंच आपल्यासाठी योग्य व सुरक्षित आहे का हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे. असे नाही केले तर मग आयुष्यभर पश्चाताप करण्याची वेळ येऊ शकते. आज जाणून घेऊया अशा काही गोष्टी ज्या प्रत्येक तरुणीने आपल्या जोडीदारात शोधल्याच पाहिजेत. शिवाय ग्रीन फ्लॅग दिसल्याशिवाय मुलांनीही रिलेशनशिपमध्ये पुढे जाण्याचा निर्णय घेऊ नये.**

## रेड फ्लॅग आणि ग्रीन फ्लॅग

रेड फ्लॅग जोडीदाराच्या त्या सवयी असतात, ज्यामुळे तुम्ही दुःखी किंवा अस्वस्थ होतात आणि तुम्हाला पुन्हा पुन्हा त्याच्यावर संशय निर्माण होतो. एकंदर त्या व्यक्ती बाबत खात्री राहत नाही. याचा सरळ अर्थ असे दाखवतो की हे नाते संपुष्टात येण्याच्या मार्गावर आहे. ग्रीन फ्लॅगचा अर्थ असा की जोडीदाराच्या त्या गोष्टी ज्या दर्शवतात की हे नाते तुम्ही दुसऱ्या स्टेजकडे घेऊन जाऊ शकता आणि बिनधास्त त्या व्यक्तीशी लग्न करण्याचा निर्णय घेऊ शकता. तो तुम्हाला नक्की आयुष्यभर सांभाळेल.

## त्यालाही आत्मविश्वास हवा

वैयक्तिक किंवा व्यावसायिक जीवनात यशस्वी होण्यासाठी, व्यक्तीमध्ये आत्मविश्वास असणे खूप महत्वाचे आहे. जर तुमच्या प्रियकराला तुमच्यावर किंवा या नात्यावर विश्वास नसेल, तर याचा अर्थ त्याला तुमच्यासोबत भविष्य दिसत नाही. लग्नासाठी नेहमी अशी व्यक्ती निवडा जी तुमच्यावर फक्त प्रेमच करत नाही तर अवघे आयुष्य तुमच्यासोबत व्यतीत करण्यासाठी ती व्यक्ती ठाम असायला हवी. अशी क्वालिटी जर तुम्हाला तुमच्या आताच्या जोडीदारात दिसत असले तर लग्नाचा विचार करण्यास हरकत नाही.

## ध्येयावर विश्वास ठेवणारा

तुमच्या ध्येयांना आणि स्वप्नांना आधार देणारा जीवनसाथी जर तुम्हाला मिळाला तर तुम्ही खरंच खूप भाग्यवान असाल. म्हणूनच, त्याच्यासोबत भविष्याची स्वप्ने पाहण्याआधी आपल्या प्रियकरामध्ये ही गुणवत्ता आहे का ते पाहणे महत्वाचे आहे. जर तुमचा प्रियकर तुमच्या निर्णयांकडे लक्ष देत नसेल किंवा तुमच्या इच्छांना निरर्थक म्हणत असेल तर तो तुमचा जीवनसाथी होण्यास योग्य नाही असेच संकेत त्यातून मिळतात. कारण जोडीदार असा हवा जो तुमची प्रत्येक गोष्ट आपली म्हणेल.

## मनमोकळा संवाद

संवाद ही आनंदी नात्याची गुरुकिल्ली मानली जाते. जिथे दोन लोक एकमेकांचे ऐकायला तयार असतात तिथे संघर्षाची शक्यता कमी असते. अशा परिस्थितीत जर तुम्ही आणि तुमचा प्रियकर कोणत्याही गोष्टीबाबत जर मनमोकळा संवाद साधत असाल तर याचा अर्थ तुमच्यामधील बॉन्डीन्ग आणि केमिस्ट्री खूप सुंदर आहे आणि तुम्ही हे नाते आयुष्यभरासाठी जपू शकता.

## प्रभावाखाली येणारा नसावा

अशा लोकांवर विश्वास ठेवणे कठीण आहे जे चटकन एखाद्याच्या प्रभावाखाली येतात. म्हणूनच बॉयफ्रेंडमध्ये आपल्या भावी पतीला शोधण्यापूर्वी नेहमी त्याचे व्यक्तिमत्त्व पूर्णपणे तपासा. तो कोणाच्याही बोलण्यात लगेच येत नाही ना, किंवा छोट्याश्या गोष्टीवरून सुद्धा संशयी वृत्तीने वागत नाही ना ते तपासा. जर त्याला अशी सवय असले तर लग्नानंतर तुमचे आयुष्य उध्वस्त व्हायला वेळ काग्णार नाही. कारण अशी लोकं कधीच सारासार विचार करणारी नसतात आणि त्याचा त्रास स्वतःला होतो.

## चुकांची जबाबदारी घेणारा

आपल्या चुका मान्य करणे हे एक उत्तम व्यक्ती असण्याचे लक्षणे आहे. जे आपल्या चुका मान्य करत नाहीत, ते सर्व चुकांसाठी इतरांना दोष देतात. मग अशा व्यक्तीसोबत आयुष्यभर आनंदाने जगता येईल का? हा प्रश्न स्वतःला विचारा आणि अशा जोडीदारापासून दूरच राहा.

## तुमच्यासाठी वेळ काढणारा

जर तुमचा जोडीदार त्याच्या बिझी वेळापत्रकातूनही तुमच्यासाठी वेळ काढत असेल तर याचा अर्थ तुम्ही त्याच्यासाठी महत्त्वाचे आहात. त्याच्या आयुष्यात तुमची किंमत खूप मोठी हे आणि तुमचे स्थान अव्वल आहे. ही गोष्ट चांगल्या जोडीदाराचेही लक्षण आहे. त्यामुळे अशा व्यक्तीसोबत तुम्ही सुखी संसाराची स्वप्ने पाहू शकता.

# स्माईलिंग डिप्रेशन!



**नैराश्यात अनेक जण एकटे राहतात, रडणे, ओरडतात, अशा लोकांची सतत चिडचिड होते. पण काही जण लोकांच्या बाबतीत असे होत नाही. काही जण त्यांचे दुःख एक स्माईलच्या मागे लपवतात. या प्रकाराला स्माईलिंग डिप्रेशन म्हणतात. नात्यात अनेकदा होणाऱ्या छोट्या मोठ्या भांडणांमुळे अनेकदा नैराश्य येते. एखाद्या व्यक्तीच्या आत्महत्येनंतर बरेचदा लोक त्याच्याबद्दल सांगतात की अशी व्यक्ती खूप छान होती, नेहमी आनंदी दिसायची, प्रेमळपणे भेटायची. अखेर ती व्यक्ती आत्महत्येसारखे पाऊल कसे उचलू शकते? जेव्हा बाहेरून आनंदी दिसणारे लोक नैराश्यामुळे आत्महत्या करतात तेव्हा अशी प्रकरणे स्माईलिंग डिप्रेशनची असतात. हसरा चेहराही नैराश्याचा बळी ठरू शकतो हे समजून घेणे आवश्यक आहे.**

## तीन प्रमुख लक्षणे

अभ्यासक सांगतात, की असे नैराश्य इतर प्रकारांपेक्षा खूप वेगळे आहे, त्यामुळे ते ओळखणे थोडे कठीण आहे. पण या आजाराची तीन मुख्य कारणे सांगता येतात. त्यात प्रथम, अंतर्यामी दुःख, कोणत्याही कामात रस नसणे आणि लवकर थकणे. म्हणजेच तुम्ही तुमच्या दैनंदिन जीवनात खूप काही करत असाल, पण कुठेतरी तुम्हाला त्या कामांमध्ये रस नाही. यानंतर, तुम्हाला नेहमी थकवा जाणवतो . जर तुम्हाला नेहमी डोकेदुखी किंवा शरीर दुखत असेल तर आजच याकडे लक्ष द्या.

- स्वतःची तुलना इतर लोकांशी करू लागतो : नैराश्याने ग्रासलेल्या व्यक्तीच्या मेंदूतील सेरोटोनिनचे प्रमाण कमी होते. त्यानंतर आपण स्वतःची इतर लोकांशी तुलना करू लागतो. आपल्या सभोवतालच्या लोकांपैकी आपण सर्वात वाईट आहोत. तुम्ही तुमचा वाईट काळ तुमच्या चांगल्या काळाशी जोडू लागता आणि स्वतःलाच अपशब्द वापरु लागतात. तुम्ही केलेले प्रत्येक काम इतरांच्या तुलनेत कमी आणि निरुपयोगी वाटते. अशा परिस्थितीत तुम्ही तुमच्या आजूबाजूच्या लोकांशी याबद्दल बोलणे महत्त्वाचे आहे.
- तुम्ही बरे होऊ शकता : अनेक लोकांना त्यांची प्रतिमा खूप महत्त्वाची आहे. यामुळे ते नाराज असले तरी ते हसतच राहतात. मानसोपचार तज्ज्ञांच्या मते, हसऱ्या चेहऱ्यामागे दडलेले नैराश्याचे सर्वात मोठे कारण असू शकतो हे आपण स्वीकारू इच्छित नाही. आपल्या आजूबाजूचे लोक किंवा आपले मित्र काय विचार करतील किंवा काय म्हणतील या कारणाने मानसोपचार तज्ज्ञाला भेटायला अनेक जण घाबरतात आणि प्रत्येक समस्येवर आत्महत्या हाच उपाय मानू लागतात.
- लोकांशी बोलण्याचीही इच्छा नसते : ज्यांना नैराश्य असते त्याबद्दल इतर लोकांशी बोलण्याचीही इच्छा नसते, त्यांच्यासाठी नैराश्य हे सर्वात धोकादायक असते. अशा परिस्थितीत माणूस आत्महत्येचा विचार करू लागतो. अशा परिस्थितीत नैराश्याने ग्रासलेल्या व्यक्तीला असे वाटू लागते की त्याला कोणीही मदत करू शकत नाही.

### नैराश्यावर इलाज

आपल्याला अनेकदा हे समजत नाही की नैराश्याचे निदान झाल्यानंतर पुढची पायरी काय असेल? हे जाणून घेतल्यावर, सर्वप्रथम, होय, आपण नैराश्याने ग्रस्त आहात आणि आपल्याला मानसोपचार तज्ञाची आवश्यकता आहे हे स्वीकारण्याचे धैर्य गोळा करणे महत्वाचे आहे. यानंतर, ज्यांच्यावर तुमचा सर्वात जास्त विश्वास आहे अशा लोकांशी तुमच्या मनःस्थितीबद्दल बोला. आज अनेक थेरपी आणि औषधे उपलब्ध आहेत, ज्यामुळे नैराश्य संपते.

### विश्वास जिंका

जर आजूबाजूला कोणी या प्रकारचा हसत-खेळत नैराश्याचा बळी असेल, तर आपण त्याला आरामदायी वाटणे आवश्यक आहे आणि त्याची परिस्थिती जाणून घ्या. या परिस्थितीवर मात करण्यासाठी हसत-खेळत नैराश्याने ग्रासलेल्या लोकांचा विश्वास जिंकणे खूप महत्वाचे आहे.

# ही लक्षणे जाणवली तर इथेच थांबवा सर्वकाही...



**मॅच्युरिटी म्हणा किंवा जबाबदारी, हा एक असा शब्द आहे, जो वेळीच लक्षात आला तर माणसाचे जीवन यशस्वी होते. जबाबदारीबद्दल बोलायचे तरती तर शिकवून कळत नाही ती वेळेनुसारच येते आणि परिस्थितीनुसारच शिकावी लागते. मात्र, मुली या सर्व गोष्टी खूप लवकर शिकतात, पण मुलांनी त्यांच्या जबाबदाऱ्या ओळखणे खूप गरजेचे आहे. कारण लग्नानंतर त्यांची जबाबदारी पूर्णपणे दुप्पट होते. अशा परिस्थितीत पतीने परिपक्व आणि जबाबदार कसे असावे हे जाणून घेतले पाहिजे. पण ही गोष्ट सुद्धा खरी आहे की काही लोकांना जबाबदार होण्यासाठी जास्त प्रयत्न करावे लागत नाहीत. पण सगळ्यांच्या बाबतीत असं होत नाही. काही मुले लग्नानंतरही प्रत्येक गोष्टीसाठी इतरांवर अवलंबून असतात. त्यांनाही त्यांचे काम करण्यात आळस वाटतो. जर तुम्हाला शंका असेल की तुमचा नवरा देखील या श्रेणीत येतो, तर आज आम्ही तुम्हाला अशी काही लक्षणे सांगणार आहोत जी दर्शवितात की तुम्ही एका बेजबाबदार व्यक्तीशी लग्न केले आहे.**

- घरच्या कामात मदत न करणे : आजकालच्या मुलींची अपेक्षा असते की आपल्या पतीने सुद्धा घरकामात आपल्याला मदत करावी आणि ही अपेक्षा अजिबात चुकीची नाही. कारण ऑफिसचे काम सांभाळून घरचे काम करणे ही एकटी पत्नीची जबाबदारी नाही. पण तुमचा नवरा मात्र तुम्हाला घरकामात मदत करत नसेल वा तुम्हाला होणारा त्रास पाहूनही त्याचे मन विरघळत नसेल तर समजून घ्या की त्याला अजूनही त्याच्या जबाबदाऱ्यांची जाणीव नाही. तो अजूनही लग्नाआधी होता तसाच वागतो आहे.
- सतत घरी उशिरा येणे : अधूनमधून कामावर उशीर होणे अगदी सामान्य आहे. पण तुमचा नवरा नेहमी उशिरा येतो आणि कोणत्याही गोष्टीसाठी वेळेवर पोहोचत नसेल, तर हे एक बेजबाबदार व्यक्ती असण्याचेच लक्षण आहे. अशा व्यक्तीसोबत तुमचे जीवन व्यर्थ आहे.
- सगळं काही तुम्हालाच करावं लागतं : पत्नी आपल्या पतीसाठी सर्व काही करण्यास तयार होते. पण त्या बदल्यात पतीने तिची काळजी घेतली नाही तर पत्नीचा हिरमोड होणे साहजिक आहे. तुमच्या जीवनात तुमच्या पतीचे काहीच योगदान नसेल तर तो एक बेजबाबदार व्यक्तीच आहे.
- वचन न पाळणे : वचन मोडणे ही केवळ नात्यासोबतची प्रतारणाच नाही तर एक त्रासदायक भावना सुद्धा आहे. जर तुमचा नवरा तुम्हाला एखादे वचन वा आश्वासन देतो पण वेळ आली की ते विसरतो आणि जे मनाला हवे तेच करतो. तुमच्या मानाचा अजिबात विचार करत नाही तर हे लक्षण आहे की तुम्ही अशा पुरुषाशी लग्न केले आहे ज्याला तुमच्या मनाची अजिबात पर्वा नाही.
- उधळपट्टी करणे : लग्नानंतर कोणत्याही पतीला आर्थिक नियोजन हे करावेच लागते. पण जर तुमचा नवरा खर्चीक असेल आणि भविष्यासाठी त्याच्याकडे कोणतीही बचत नसेल तर



तुमचे भविष्य खरोखरच धोक्यात आहे. निवृत्तीनंतर आजारपण किंवा घर चालवण्यासाठी पैसा खूप महत्त्वाचा असतो. यात केवळ पत्नीनेच नव्हे तर पतीनेही मोठे योगदान दिले पाहिजे. जर तुमचा नवरा पैसा अजिबात वाचवत नसेल तर ते त्याच्या बेजबाबदारपणाचे लक्षण आहे.

# अशा रिलेशनशिपचे भवितव्य काय?

**कोणतेही नाते हे दोन व्यक्तींनी मिळून बनते. त्यामुळेच जर ते निभवायचे असेल तर दोघांकडून प्रयत्न होणे देखील तितकेच गरजेचे असते. जेव्हा दोघांपैकी केवळ एकच व्यक्ती नाते वाचवण्यासाठी धडपडत असतो आणि दुसऱ्या व्यक्तीला त्याची कदरही नसते तेव्हा अशा रिलेशनशिपचे भवितव्य काहीच नसते. हीच स्थिती खूप काळ राहिली तर नात्याशिवाय अन्य संबंध सुद्धा बिघडत जातात. एकवेळ अशी येते की दोन्ही व्यक्ती एकमेकांना एकमेकांचे शत्रू समजू लागतात.**



अनेकदा जी व्यक्ती संवेदनशील असते ती भावनिकदृष्ट्या निखळून पडते. हे होऊ द्यायचे नसेल तर वेळीच नात्याची स्थिती ओळखायला हवी. अनेकांना हेच ओळखता येत नाही आणि त्याचा परिणाम म्हणून आयुष्य उद्ध्वस्त होते. असे नाते हे अनेकदा एकतर्फी नाते म्हणूनच ओळखले जाते. आज आम्ही तुम्हाला असे काही संकेत सांगणार आहोत जे तुम्हाला नाते ओळखण्यात मदत करू शकतात.

### नेहमी तुम्हीच समजून घेत असाल तर...

जर नात्यातील एकच व्यक्ती नेहमी तडजोड करत असेल तर नाते संबंध हळूहळू बिघडू लागतात आणि ते उद्ध्वस्त व्हायला वेळ लागत नाही. तसेच या गोष्टीतून हेच दिसते की तुमचे नाते घट्ट नाही. उलट केवळ एका व्यक्तीमुळे ते टिकून असल्याने कमकुवत आहे. तडजोड करावी लागणे हे एकतर्फी प्रेमाचे सर्वात सामान्य लक्षण आहे. प्रेमात पडल्यानंतर तुम्ही जर सतत समजून घेत असाल वा तडजोड करत असाल तर सावधान व्हा. कारण जोडीदाराला सवय लागली तर तो त्याचा गैरफायदा घेऊ शकतो.

### ओढ फक्त तुम्हाला असेल तर

कोणतेही नाते टिकवण्यासाठी दोन व्यक्तींचे समान प्रयत्न आवश्यक असतात. अशा परिस्थितीत, जर केवळ तुम्हीच तुमच्या जोडीदाराला भेटायला किंवा संपर्कात राहायला, तुमच्या भावना शेअर करायला सांगत असाल, पण तो मात्र त्यासाठी काहीच प्रयत्न करत नसेल वा त्याला या गोष्टींची पर्वा नसेल तर हे देखील एकतर्फी नातेसंबंधाचे लक्षण आहे.

### नेहमी तुम्हीच चुकीचे ठरत असाल तर



जर तुमचा पार्टनर कोणत्याही चुकीची जबाबदारी घेत नसेल आणि नेहमी तुम्हीच माफी मागावी आणि समजून घ्यावे अशी अपेक्षा करत असेल तर हे स्पष्टपणे एकतर्फी प्रेमाचे लक्षण आहे. कारण जर त्यालाही तुमचा आदर असेल तर प्रत्येकवेळी तो तुम्हाला चुकीचे ठरवणार नाही.

### वारंवार स्वत:ला सिद्ध करणे

एकतर्फी नात्यात समोरची व्यक्ती तुम्हाला अशा स्थितीत आणते की तुम्ही स्वतःचे महत्त्व विसरता. तुम्हाला या नात्यात राहायचे आहे की नाही हे माहित नसते पण तरीही जोडीदारासाठी स्वतःला पुन्हा पुन्हा सिद्ध करत असला तरहे सुद्धा एकतर्फी नात्याचे लक्षण आहे आणि अशा नात्यामधून तुम्ही जास्त अपेक्षा करू शकत नाहीत.

### एकटेपणा जाणवणे

जर तुम्ही एकतर्फी नात्यात असाल तर तुम्हाला तुमच्या जोडीदाराकडून कधीच भावनिक आधार मिळणार नाही. जेव्हा तुम्ही तुमच्या मनातील गोंधळ त्याच्याशी शेअर घेण्याचा प्रयत्न कराल तेव्हा तो एक तर तुम्हाला इग्नोर करेल किंवा वरवर दिलासा देईल. पण मनापासून तो कधीच तुमची गोष्ट एकून घेणार नाही. कारण त्याच्यासाठी तुमच्या फिलिंगला किंमत नसेल. त्यामुळे असे काही होत असेल तर हे देखील एकतर्फी नात्याचे लक्षण आहे व अशा नात्यातून तुम्ही वेळीच बाहेर पडले पाहिजे.

## शॉर्ट न्यूज

### रमजान ईदच्या शुभेच्छांमुळे राष्ट्रीय ऐक्याचे दर्शन

**नेवासा :** मुस्लीम बांधवांच्या पवित्र रमजान आज गुरूवारी देशभरात ईद-उल-फित्र अर्थात रमजान ईद साजरी केली जाते आहे. पहाटेच्या नमाज अदा केल्यानंतर रमजान ईदचा उत्साह नेवासा शहरात दिसू लागला होता. यावेळी आमदार शंकरराव गडाख यांनी मुस्लिम बांधवांची गळाभेट घेऊन गुलाब पुष्प देऊन रमजान ईदच्या शुभेच्छा दिल्या. गळाभेटीच्या या शुभेच्छांमुळे राष्ट्रीय ऐक्याचे दर्शन यावेळी घडले. नेवासा शहरातील खुपटी रोडवर असलेल्या ईदगाह मैदानावर सामूहिक ईदची नमाज अदा करण्यात आली. नेवासा पोलिस स्टेशनच्या वतीने चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

### मनपा आयुक्त यांनी घेतली निवेदनाची दखल

**नगर :** अहमदनगर कॉलेज येथील विद्युत महावितरण कार्यालय शेजारी असलेल्या हाजी हसन शहा कादरी कब्रस्तान येथे अनेक भाविक दर्शनासाठी येजा करत असून या ठिकाणी रस्त्याच्या कामाला सुरुवात करण्यात आली होती. परंतु अर्धा रस्ता पूर्ण होऊन अर्धा रस्ता खोदलेल्या परिस्थितीत आहे. त्यामुळे तेथे ड्रेनेजचे पाणी मोठ्या प्रमाणात साचत असून येण्या जाणाऱ्या नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. रमजान सण आल्याने येथे मुस्लिम समाज बांधव हे मोठ्या प्रमाणात दर्शनासाठी व नमाज पठण करण्यासाठी येतात.

### संगमनेर उपविभागातील २३ जणांना प्रवेशबंदी

**संगमनेर :** लोकसभा निवडणूक आचारसंहिता व येणारे विविध सण-उत्सव शांततेत पार पाडावेत, त्याचबरोबर आचारसंहितेचे उल्लंघन होऊ नये, यादृष्टीने संगमनेर पोलिस उपविभागातील २३ जणांना प्रवेशबंदी केली असल्याची माहिती पोलिस उपअधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांनी दिली. संगमनेर शहर, संगमनेर तालुका व अकोले पोलिस ठाणे हद्दीमधून एकूण ४६ व्यक्तींना संगमनेर व अकोले तालुक्याच्या सीमा हद्दीमध्ये प्रवेश बंदी करण्याचे प्रस्ताव उपविभागाकडे सादर करण्यात आले होते, त्यापैकी एकूण २३ व्यक्तींवर उपविभागीय अधिकाऱ्यांनी प्रवेशबंदीचे आदेश पारित केले.

### मोदींना पंतप्रधान करण्यासाठी उमेदवारी

**शिर्डी :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील विविध घटकांना मदत करण्यासाठी हाती घेतलेल्या योजना आजवरच्या एकाही सरकारला राबविता आल्या नाहीत. सामान्य जनतेला आधार ठरलेल्या मोदींना पुन्हा पंतप्रधान करण्यासाठी माझी उमेदवारी आहे. त्यासाठीच महायुतीचे कार्यकर्ते देखील कामाला लागले आहेत, असे प्रतिपादन खासदार सदाशिव लोखंडे यांनी केले. काल त्यांनी शहराच्या विविध भागांत जाऊन तेथील रहिवाशांसोबत संवाद साधला. यावेळी त्यांच्या समवेत माजी नगराध्यक्ष कैलास कोते यांच्यासह महाविकास आघाडीचे पदाधिकारी उपस्थित होते.

### महात्मा फुले जयंती उत्साहात साजरी

**राहुरी :** स्त्री शिक्षणाचे प्रणेते महात्मा ज्योतीराव फुले यांच्या जयंतीनिमित्त राहुरी शहरात विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. उत्सव समितीच्या वतीने सायं. महात्मा चौक येथून महात्मा फुले यांच्या पुतळ्याची भव्य अशी मिरवणूक काढण्यात आली होती. माजी नगराध्यक्ष उषाताई तनपूरे व चाचा तनपुरे यांच्या हस्ते पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून तसेच अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत मिरवणूकीला सुरुवात करण्यात आली. फटाक्यांची आतिषबाजी करत शहरातील मुख्य रस्त्यावरून मिरवणूक काढण्यात आली. दरम्यान महिलांनी फुगडी खेळून आनंद लूटला.

# मुठभर लोकांनी स्वता:च्या फायद्याकरिता काँग्रेस पक्ष गहाण ठेवला

## महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचा आरोप



**संगमनेर : प्रतिनिधी**

**मुठभर लोकांनी स्वताच्या फायद्याकरिता काँग्रेस पक्ष शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांच्याकडे गहाण ठेवल्याचा गंभीर आरोप राज्याचे महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केला. काँग्रेस मधील काही नेते स्वता:चे नेतेपद टिकवण्यासाठी काम करत असून त्यांना पक्षाचे काही घेणे देणे राहिले नसल्याची टीकाही त्यांनी केली.**

बुथ सक्षमीकरण अभियानाच्या निमिताने तालुक्यातील आश्वी बुद्रुक, उमरी बाळापूर येथे मंत्री विखे पाटील यांनी बुथ प्रमुख तसेच पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी संवाद साधला. त्यानंतर ते माध्यमांशी बोलत होते.

ज्या ठिकाणी पक्षाचे प्राबल्य आहे अशा जागा सोडून द्यायचा स्वता:च्या फायद्यासाठी नको तिथे उमेदवार देण्याचे काम राज्यातील काँग्रेसी नेत्यांनी केले असल्याकडे लक्ष वेधून, बाळासाहेब थोरात स्वता: ला जेष्ठ नेते समजतात पण थोरातांची आता किव येते कारण त्यांना स्वता:च्या जिल्ह्यात एकही जागा मिळवता आली नाही. उत्तर महाराष्ट्रात ८ जागा असताना तिथे ही काँग्रेसला एकही जागा मिळाली नाही.यामुळे थोरातांनी काय काम केले? असा सवाल विखे पाटील यांनी केला.

नगर जिल्ह्यात काँग्रेसला का जागा मिळाली नाही याची कारणे लोकांना आणि कार्यकर्त्यांना थोरातांनी सांगितली पाहिजेत असे थेट आव्हान देवून,सांगलीच्या जागेसाठी आग्रही असणाऱ्या थोरातांनी स्वता:च्या नगर जिल्ह्यात पक्षाचे काय चालले आहे याकडे लक्ष द्यावे असा सल्ला सुद्धा त्यांनी यावेळी थोरातांना दिला.

# कर्जत शहरासह तालुक्यात रमजान ईद उत्साहात

## मुस्लिम बांधवांकडून सामुदायिक नमाज पठण



**कर्जत : प्रतिनिधी**

**कर्जत शहर आणि तालुक्यात रमजान ईद उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी शहरातील ईदगाह मैदानात सामुदायिक नमाज पार पडली. यावेळी तमाम मुस्लिम बांधवांनी विश्वशांतीसाठी दुवा मागितली. शेवटी हिंदू-मुस्लिम बांधवांनी एकमेकांना आलिंगन देत रमजान ईदच्या शुभेच्छा दिल्या.**

बुधवारी संध्याकाळी चंद्रदर्शन झाल्यावर रमजान ईदची तयारी सुरू झाली. ३० दिवसाच्या निरंक रोजानंतर रमजानची सांगता गुरुवारी झाली. सकाळी ८:३० वाजता कर्जत येथील ईदगाह मैदानावर मोठ्या संख्येने मुस्लिम बांधवानी ईद उल फित्रची सामुदायिक नमाज आणि खुदबा पठण मौलाना युसूफ यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.

यावेळी आमदार रोहित पवार, नीलेश लंके यांच्यासह पोलीस निरीक्षक मारुती मुळूक, भाजपाचे प्रवीण घुले, माजी नगराध्यक्ष नामदेव राऊत, जिल्हा बँकेचे संचालक बाळासाहेब साळुंके, संत सदगुरु गोदड महाराज अन्नछत्र मंडळाचे अध्यक्ष शशिकांत पाटील, युवक काँग्रेसचे सचिन घुले, नगरसेवक भाऊसाहेब तोरडमल, भास्कर भैलुमे, अमृत काळदाते, संतोष मेहेत्रे, माजी सरपंच शिवाजी फाळके, तात्यासाहेब ढेरे, माजी सरपंच काका धांडे, ॲड. उत्तम नेवसे, ॲड. संजीवन गायकवाड, सतीश समुद्र आदींनी ईदगाह मैदानात येत मुस्लिम बांधवांना रमजान ईदच्या शुभेच्छा दिल्या.

(पान १ वरून)

### मटण, आमरसाच्या जेवणावळींची धुम !

वर्षांपासून नीलेश लंके यांनी या निवडणूकीची तयारी सुरू केली. त्यामुळे संपूर्ण मतदारसंघातील गावागावांमध्ये त्यांनी कार्यकर्त्यांची स्वतंत्र फळी उभी केली आहे. विविध गावांतील स्थानिक राजकीय कार्यकर्त्यांबरोबरच लंके यांची फळीही जनसंवाद यात्रेत हिरीरीने सहभागी होत आहेत. स्थानिक राजकीय कार्यकर्ते व लंके यांचे शिलेदार हातात हात घालून नियोजन करत असल्याचे गावागावांत लंके यांच्या यात्रेस प्रतिसाद मिळत आहे.

लंके यांचा वारू सुसाट सुटल्याने आता खा. डॉ. विखे हे देखील सतर्क झाले असून त्यांनी विविध सभा घेण्यास सुरूवात केली आहे. या सभांना उपस्थित नागरीकांना व्हेज, नॉनव्हेज जेवणाची मेजवाणी देण्यात येत आहे. त्याची चर्चा विविध समाजमाध्यमांवर झडत आहे.

# शेवगाव व पाथर्डी तालुक्यातील शेतकऱ्यांना मुळा उजवा कालव्याच्या आवर्तनातून तलाव, बंधारे भरून द्या - चंद्रशेखर घुले




**नगर : प्रतिनिधी**

शेवगाव व पाथर्डी तालुक्यातील मुळा लाभ क्षेत्रातील गावातील पिण्याच्या पाण्याचे तलाव व बंधारे भरून देण्यात यावे व मुळा धरणांमध्ये पुरेसा पाणीसाठा उपलब्ध असून गेल्या वर्षी पाऊस अतिअल्प झाल्यामुळे शेवगाव व पाथर्डी तालुक्यातील पिकाची दैनीय अवस्था झाली होती. सध्याच्या परिस्थितीमध्ये पिण्याच्या पाण्याचे उद्भव कोरडे पडलया मुळे लोकांना पिण्यासाठी पाणी उपलब्ध नाही. व जनावरांचा चारा देखील वाळू लागला आहे. त्यामुळे चालू उन्हाळी आवर्तनातून शेवगाव व पाथर्डी तालुक्यातील टेलच्या भागातील शेतकऱ्यांना उभ्या पिकासाठी व पिण्याच्या पाण्यासाठी पूर्ण दाबाने पाणी द्यावे व पाणी राखीव न ठेवता पूर्ण क्षमतेने सिंचन करून तलाव, बंधारे, पिण्याच्या पाणी साठी भरून द्यावे जेणेकरून शासनाचा टँकरचा खर्च वाचेल या विविध मागण्यांसाठी माजी आमदार चंद्रशेखर घुले पाटील यांच्या नेतृत्वाखाली शेवगाव व पाथर्डीच्या शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमट व मुळा पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता सायली पाटील यांना निवेदन देण्यात आले.

यावेळी आमदार चंद्रशेखर घुले समवेत राष्ट्रवादीचे जिल्हा कार्याध्यक्ष संजय कोळगे, राजेंद्र देशमुख, अंबादास कळमकर, सुधाकर लांडे, शहादेव खोसे, अशोक मेरड, विक्रम लोढे, राजेंद्र आढाव, रोहन साबळे, माणिकराव बुधवंत, उदय बुधवंत, जय बुधवंत, राहूल बेडके, बबन जाधव, अनंत सावंत, जगन्नाथ साबळे, गणेश खंबरे, अजय साबळे, लक्ष्मण नांगरे, चंद्रकांत निकम, गंगाधर भोसले, तुकाराम मुळे, संजय मराठे, लक्ष्मण नगरे आदी उपस्थित होते.









# निघोज परिसरात रमजान ईद सण उत्साहात साजरा

## हिंदू -मुस्लिम बांधवांनी दिल्या शुभेच्छा



■ निघोज येथील ईदगाह मैदानावर मुस्लिम समाज बांधवांनी नमाज अदा केली.

निघोज : प्रतिनिधी

**गेली एक महिना रोजे धरीत मुस्लिम समाज बांधवांनी गुरुवार दि.११ रोजी सकाळी साडे आठ ते नऊ या दरम्यान ईदगाह मैदानावर नमाज अदा करीत रमजान ईद हा सण उत्साहात साजरा केला. एकमेकांना शुभेच्छा देऊन तसेच शिरखुर्मा या प्रसादाचे वाटप करीत हा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी मुस्लिम समाजाचे धर्मगुरू मौलवी यांनी धर्म,समाज तसेच देशाची संस्कृती यावर उपस्थितांना मार्गदर्शन केले.**

संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुका अध्यक्ष सचिन पाटील वराळ, सरपंच चित्राताई वराळ पाटील, उपसरपंच माऊली वरखडे, ग्रामपंचायत सदस्या शबनूर इनामदार, पारनेर तालुका पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष दत्ताजी उनवणे, उपाध्यक्ष भास्करराव कवाद, कार्यकारिणी सदस्य अमोल खिलारी, तालुका अध्यक्ष बाबाजी वाघमारे, पत्रकार संदीप ईधाटे, पत्रकार सचिन जाधव, प्रेस फोटोग्राफर व पारनेर तालुका पत्रकार संघाचे सदस्य जयसिंग हरेल , पत्रकार संघाचे शहराध्यक्ष योगेश खाडे, आनंद भुकन, खजिनदार विजय रासकर, सहसचिव अविनाश भांबरे, मंगेश वराळ, रोहन उनवणे, यांनी सोशल मिडिया माध्यमातून तसेच प्रत्यक्ष मुस्लिम समाज बांधवांची भेट घेत रमजान ईदच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी अनेक हिंदू समाज बांधवांनी मुस्लिम समाज बांधवांच्या घरी जाऊन ईदच्या शुभेच्छा दिल्या यावेळी असंख्य लोकांनी शिरखुर्मा या प्रसादाचा लाभ घेतला. बुधवार दि. १० रोजी रात्री आकाशात चंद्राचे दर्शन मुस्लिम समाज बांधवांना झाल्यानंतर फटाक्यांची आतषबाजी करीत रमजान ईदचे जोरदार स्वागत करण्यात आले.

### एकात्मतेची गौरवशाली परंपरा

**गेली एक महिना रोजा हा पवित्र उपवास ग्रहण करीत मुस्लिम समाज बांधवांनी सर्व समाज बांधवांच्या सुखासाठी अल्लाकडे प्रार्थना केली. अतिशय पवित्र महिना म्हणून रमजान महिन्याची ख्याती असून सर्व समाजबांधवांनी एकत्र येऊन रमजान ईद शुभेच्छा देणे हा धार्मिक संस्कृती वाढविण्यासाठी प्रयत्न करण्याचा एक चांगला विचार असून आपल्या राज्यात हिंदू - मुस्लिम समाजबांधव गुण्यागोविंदाने एकत्र नांदत आहे ही गौरवशाली परंपरा जतन करण्याचे काम सर्व समाजाकडून होणे गरजेचे आहे अशी शुभेच्छा सरपंच चित्राताई वराळ पाटील यांनी दिली आहे.**

# अभ्यासात सातत्य ठेवा, यश तुमचेच!

## राणीताई लंके यांचा सल्ला

कर्जुले हर्या : प्रतिनिधी

**विद्यार्थ्यांनो आपले आवडीचे करीअर निवडा, अभ्यासात सातत्य ठेवत कठोर परिश्रमाची तयारी ठेवा, यश तुमचेच असल्याचे प्रतिपादन जिल्हा परिषदेच्या सदस्या राणीताई लंके यांनी केले.**

कर्जुलेहर्या येथील मातोश्री सायन्स कॉलेजमधील बारावी सायन्सच्या विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभ कार्यक्रमात लंके प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या. यावेळी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा व करीअर या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शितल आहेर या होत्या. शिक्षक बँकेचे मा. चेअरमन रावसाहेब रोहोकले हे यावेळी उपस्थित होते.

लंके म्हणाल्या, आजचे विद्यार्थी उद्याचे देशाचे अधारस्तंभ आहेत. शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात मुलींचे, महिलांचे योगदान वाढत असून ते कौतुकास्पद आहे. शिक्षण क्षेत्रात मोठी स्पर्धा असून विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीचे क्षेत्र निवडूण जीवनात यशस्वी व्हा असा सल्ला लंके यांनी दिला.

रावसाहेब रोहोकले यांनी मुलांना भविष्यातील आव्हाने काय आहेत याविषयी मार्गदर्शन केले. शिस्त, संस्कार व गुणवत्ता वाढीसाठी कोणकोणत्या उपाययोजना केल्या पाहिजेत याची माहीतीही त्यांनी दिली. यश व अपयश या एकाच नाण्याच्या दोन बाजू असून अपयश आले तर खचू नका, कोलमडू नका, पुन्हा प्रयत्न करा, यश नक्कीच तुमच्या पायाशी लोळण घेत येईल. स्वतः वर विश्वास ठेवा. स्वतःची किंमत कधीही कमी करून घेऊ नका असे आवाहन त्यांनी केले.

संचालिका शितल आहेर यांनी विद्यार्थ्यांनी आवडेल त्या क्षेत्रात करिअर करावे, मात्र जिथे जाल तिथे कष्ट करण्याची तयारी ठेवा. आपल्या आई-वडीलांचे, शाळेच नाव उज्वल करा असा सल्ला दिला. मोबाईल, टीव्ही सारख्या माध्यमांपूसन दुर राहतानाच चांगल्या मित्रांची संगत धरा असेही आहेर यांनी सांगितले.

यावेळी संस्थेचे सचिव किरण आहेर, कार्याध्यक्ष डॉ. दीपक आहेर, बाळासाहेब उंडे, डॉ. श्वेतांबरी आहेर, यशवंत फापाळे, प्राचार्य राहुल सासवडे, प्राचार्य डॉ. कृपाल पवार, डॉ. राहुंल रहाणे, गणेश हांडे, राजेंद्र साठे, कविता भालेराव, गणेश कुठे, अजिंक्य बिडकर आदी उपस्थित होते.



■ मातोश्री शैक्षणिक संकुलात बारावीच्या विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभात राणीताई लंके यांनी मार्गदर्शन केले.

# रामजन्मोत्सव : अखंड हरिनाम सप्ताहास मोठा प्रतिसाद

## ४७ वर्षांची परंपरा कायम



निघोज : प्रतिनिधी

**गेली ४७ वर्षाची अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता कायम ठेवत निघोज ग्रामस्थ व प्रभू श्रीराम भावीकांनी प्रभू श्रीराम जन्मोत्सव निमित्ताने सुरु केलेल्या अखंड हरिनाम सप्ताहास मोठा प्रतिसाद मिळत असून भाविकांनी या अखंड हरिनाम सप्ताहाचा लाभ घेऊन हिंदू धर्म संस्कृती वाढविण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन निघोज ग्रामस्थ व प्रभू श्रीराम जन्मोत्सव समितीने केले आहे.**

गुढीपाडवा दिनी आळंदी देवाची येथील कैलास महाराज येवले यांच्या किर्तनाने अखंड हरिनाम सप्ताहाची सुरुवात झाली आहे. शाम महाराज पवार, तुकाराम महाराज मुळीक, मुरारी महाराज नामदासी, चैतन्य महाराज देहूकर, चैतन्य महाराज पाटील, आसाराम महाराज बढे, नारायण महाराज जाधव, विशाल महाराज हाडवळे, पुंडलिक महाराज जंगले शास्त्री आदिंचे किर्तन होणार असून गुरुवार दि.१८ रोजी सकाळी दहा ते बारा वाजता मनोहर महाराज शिनारे यांचे काल्याचे किर्तन होणार आहे. पहाटे चार ते पाच काकडा, आठ ते अकरा नंदकुमार महाराज वराळ व पोपटमहाराज देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली ज्ञानेश्वरी पारायण , गाथा भजन, नियमितप्रमाणे हरिपाठ, सायंकाळी पवनमहाराज तनपुरे यांची हनुमान कथा, रात्री सात ते नऊ किर्तन त्यानंतर महाप्रसाद व जागर यामध्ये परिसरातील भजनी मंडळे सहभागी होणार आहेत.श्रीराम भजनी मंडळ निघोज, शिरसुले भजनी मंडळ, कन्हैया भजनी मंडळ निघोज -पठारवाडी ,बोदगेवाडी भजनी मंडळ, पांढरकरवाडी भजनी मंडळ, वडगाव गुंड भजनी मंडळ, मोरवाडी तसेच गाडीलगाव भजणी मंडळ सहभागी होणार आहे.

# विक्रमसिंह कळमकर यांच्या निवडीचे कडूस येथे जोरदार स्वागत

## विकासात्मक कामे मार्गी लावल्याची जनभावना



सुपा : प्रतिनिधी

**पारनेर तालुका राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षपदी पाडळी रांजणगावचे विद्यमान सरपंच विक्रमसिंह कळमकर यांची निवड झाल्याबद्दल कडूस गावामध्ये ग्रामस्थांनी उस्फुर्त स्वागत करत कळमकर यांच्या निवडीबद्दल कडूस येथे नुकताच सत्कार करण्यात आला.**

या वेळी कडूसचे युवा सरपंच मनोज मुंगसे म्हणाले की, पाडळी रांजणगावचे सरपंच विक्रमसिंह कळमकर हे अनेक वर्षे सरपंच असून राष्ट्रवादीचे अध्यक्ष म्हणूनही तालुक्यात काम करत होते. त्यांनी अध्यक्षपदावर काम करत असताना अनेक विकासात्मक कामे मार्गी लावली. आम्ही वेगवेगळ्या पक्षात असलो तरी त्यांचे काम इतरांना आदर्शवत ठरले आहे.

कळमकर म्हणाले की, माझ्यासारख्या सर्वसामान्य कार्यकर्त्याला अजितदादांनी अध्यक्ष पदी दिलेली संधी हे निष्टेची पावती आहे. त्यामुळे मिळालेल्या संधीच्या माध्यमातून तालुक्यात काम करीत असतांना आपल्या परिसरालाही विकास कामांच्या माध्यमातून न्याय देता येईल. तसेच कडूस गावातील नागरिकांनी कायम युवकांना पाठबळ देण्याचे काम केले आहे.या पुढे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्फत जास्तीत जास्त विकास निधी गावोगावी कसा उपलब्ध होईल या साठी आपण व मनोज मुंगसे प्रयत्नशील राहू असे सांगितले.

या सत्कार प्रसंगी कडूस गावचे युवा सरपंच मनोज मुंगसे, मा चेअरमन राजेंद्र बबन करंजुले, चेअरमन शिवाजी दिवटे, संचालक बी.के.दिवटे,संचालक संजय रावडे, मा संचालक संतोष मुंगसे, सामाजिक कार्यकर्ते दादासाहेब मुंगसे, हेमंत रंगसिंग, राजेंद्र रावडे, तुषारजी काळे,माजी उपसरपंच बबनराव करंजुले,माजी उपसरपंच मच्छिंद्र नरवडे,प्रगतशील शेतकरी हरी नरवडे, सुहास नरवडे, सामाजिक कार्यकर्ते मंगेश काळे, सामाजिक कार्यकर्ते संतोष लंके पाटील, संदीप जाधव, योगेश जाधव, योगेश रावडे, संतोष दिवटे, सामाजिक कार्यकर्ते गणेश मुंगसे, सामाजिक कार्यकर्ते बापू रावडे, प्रगतशील शेतकरी दादा रावडे, आप्पासाहेब कळमकर, गणेश कळमकर आदी यावेळी उपस्थित होते.

# भक्ती आबूजचे एनएसएसई परिक्षेत यश

## नारायणगाव केंद्रात सहावा क्रमांक

नारायणगाव : प्रतिनिधी

**नॅशनल स्कॉलर सर्च एक्झामच्या वतीने घेण्यात आलेल्या परिक्षेत भक्ती देविराज आबूज हिने नारायणगाव केंद्रात इयत्ता ४ थी मध्ये ६ वा क्रमांक पटकविला आहे.**



या परीक्षेत श्रीमती सीताबाई रामचंद्र केदारी बालकमंदिर, नारायणगाव केंद्रातून चौथीच्या सुमारे तीनशे विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती. या परिक्षेचा निकाल नुकताच जाहिर झाला असून यात भक्तीने यश मिळविले आहे.

स्पर्धा परीक्षांबद्दल विद्यार्थ्यांच्या मनात आवड निर्माण व्हावी व स्पर्धा परीक्षांचा विद्यार्थ्यांना लहानपणापासूनच सराव व्हावा या उद्देशाने संपूर्ण राज्यात एकाच वेळी ही परीक्षा घेतली जाते. या परीक्षेत संपूर्ण राज्यभरातून इयत्ता पहिली ते आठवी पर्यंतचे लाखो विद्यार्थी सहभागी होत असतात. या शैक्षणिक वर्षात २१ फेब्रुवारी २०२४ रोजी सदर परीक्षा पार पडली होती व तिचा निकाल नुकताच जाहीर करण्यात आला आहे. शिक्षिका अर्चना कारंडे यांचे भक्ती आबूज हिला मार्गदर्शन लाभले.या यशाबद्दल अभिनंदन होत आहे.

# निघोज जि.प.प्राथ.शाळेचे मंथन परिक्षेत यश

## यशश्री आहेर राज्यात तिसरी



निघोज : प्रतिनिधी

**जिल्हा परिषद प्राथमिक शाळा निघोज या शाळेतील इयत्ता दुसरीतील विद्यार्थिनी यशश्री बाळासाहेब आहेर ही मंथन परीक्षेमध्ये १४६ गुण मिळवून राज्याच्या यादीमध्ये तिने तिसरा क्रमांक पटकावला. त्याचबरोबर प्रांजल प्रभाकर शिंदे या विद्यार्थिनीने मंथन परीक्षेमध्ये १३६ गुण मिळवून राज्याच्या यादीमध्ये आठवा क्रमांक पटकावला.**

या यशाबद्दल विद्यार्थिनींचे आणि या विद्यार्थिनींना मार्गदर्शन करणाऱ्या त्यांच्या वर्गशिक्षिका सालके मॅडम आणि मार्गदर्शन करणारे शाळेतील सहशिक्षक श्री खोसे सर,श्री मगर सर, काळोखे सर, काळे सर,दिघे मॅडम यांचे शाळेचे मुख्याध्यापक श्री शिंदे सर, केंद्रप्रमुख श्री बाचकर साहेब, विस्तार अधिकारी श्री केसकर,गटशिक्षणाधिकारी श्रीमती राणे मॅडम तसेच सरपंच चित्राताई वराळ, उपसरपंच माऊली वरखडे, ग्रामपंचायत सदस्या भावना साळवे, ग्रामपंचायत सदस्या शबनूर इनामदार, व्यवस्थापन व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रोहन उनवणे आणि ग्रामस्थ यांनी अभिनंदन केले.

# दरोडी येथे हजरत पीर शेख बाहुद्दीन चिश्ती यांच्या उरुसास प्रारंभ

## राज्यभरातून हिंदू- मुस्लिम भाविकांची हजेरी


अळकुटी : प्रतिनिधी

**हिंदू मुस्लिम ऐक्याचे श्रद्धास्थान व जागृत देवस्थान म्हणून प्रसिद्ध असलेल्या पारनेर तालुक्यातील दरोडी येथील किबला हजरत पीर शेख बाहुद्दीन चिश्ती रहे. यांचा उरूस आज दि. १३ पासून मोठया उत्साहात सुरु होत असून दि. १६ पर्यंत चार दिवस चालणाऱ्या या उरुसास राज्याच्या कानाकोपऱ्यातून हिंदू व मुस्लिम भाविकांची मोठया प्रमाणात गर्दी करतात.**

पारनेर - अळकुटी रस्त्यावरील रांधे फाट्यापासून तीन किलोमीटर तर अळकुटी येथून पाच किलोमीटर अंतरावर असलेल्या तीनही बाजूंनी डोंगरांनी वेढलेल्या दरोडी या छोट्या गावात डोंगराच्या पायथ्याशी हिरव्यागार झाडीत पीरसाहेबांची दर्गा आहे. पीर शेख बाहुद्दीन चिस्ती यांचा दर्गा असलेली ही वास्तू ८२६ वर्षांपूर्वीची असून पीर साहेबांचे वर्षातून दोन उरूस होतात. पहिला उरूस पीरसाहेबांनी समाधी घेतली त्या तारखेला म्हणजे दरवर्षी उर्दू ता. ४ शाबानला होतो. हा उरूस फक्त एकच दिवस असतो. दुसरा उरूस हिंदू पंचांगाप्रमाणे पाडवा चैत्र शुद्ध एकपासून पाचव्या दिवशी सुरू होतो. हा उरूस चार दिवसांचा असतो. या उरूसासाठी राज्यातील अनेक ठिकाणांहून हिंदू-मुस्लीम भाविक येतात.

चार दिवस चालणाऱ्या उरुसात दि. १३ पंचमीला संदल, दि. १४ षष्टीला चिराग, दि. १५ सप्तमीला भर यात्रा (कंदोरी), दि. १६ अष्टमीला फुट यात्रा (पानफूल) होते. या उरूसास हिंदू-मुस्लिम समाजाच्या मोठ्या प्रमाणावर कंदोऱ्या होतात. लोक नवस फेडण्यासाठी येथे हजेरी लावतात. या चार दिवसांत लाखो भाविक दर्शन घेतात.

दिवसेंदिवस येथील भाविकांची गर्दी वाढत आहे. भाविकांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी देवस्थान ट्रस्ट मार्फत तसेच स्थानिक प्रशासनाच्या वतीने योग्य ते नियोजन करण्यात आले असून देवस्थानचा परिसर सुशोभित करण्यासाठी अनेक योजना पुर्णत्वास आहेत. या उरुसास दरोडी येथे येण्यासाठी राज्य परिवहन महामंडळाने पारनेर, कल्याण, शिरूर, आळेफाटा येथून बसेसची सुविधा उपलब्ध केली असून यात्रा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी व यात्रा काळात कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पारनेरचे पोलिस निरीक्षक समीर बारवकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. जास्तीत जास्त भाविकांनी साहेबांच्या दर्शनाचा लाभ घेवून उरुसाचा आनंद घेण्याचे आवाहन दर्गाह ट्रस्टी अन्वर शेख, छबुलाल शेख, याकुब शेख, शरीफ शेख, अमिर शेख तसेच दरोडी ग्रामस्थांनी केले आहे.




■ दरोडी : येथील हजरत पीर शेख बाहुद्दीन चिश्ती रहे. यांचा दर्गा. उरुसास आजपासून सुरुवात होत आहे. (छाया : मंगेश पारखे)

### पाण्याचा योग्य वापर करावा

**वाढत्या उष्णतेच्या लाटांमुळे भूगर्भातील जलसाठा कमी होत असून सगळीकडेच पाणी टंचाईचे संकट असतानाही भाविकांची व यात्रेतील दुकानदारांची पिण्याच्या तसेच वापराच्या पाण्याची गैरसोय होवू नये म्हणून दर्गाह ट्रस्ट तसेच पारनेर पंचायत समिती मार्फत टँकरव्दारे पाण्याचे नियोजन करण्यात आले असून दुष्काळी परिस्थिती व पाणी टंचाईची जाणीव ठेवत भाविक, दुकानदार तसेच स्थानिक ग्रामस्थांनीही पाणी वाया न घालवता पाण्याचा योग्य वापर करावा तसेच दर्गाह व यात्रा परिसरात स्वच्छता राखावी.**

अन्वर शेख - दर्गाह ट्रस्टी

# दंतसमस्येत योग्य समज व दृष्टीकोन महत्त्वाचा

■ डॉ. आर.जी.सय्यद यांचे मत

■ पारनेरात डॉ.वैद्य दंत रुग्णालयाचे उद्घाटन

पारनेर : प्रतिनिधी

**ग्रामीण भागात दंत क्षेत्रात कामाची अधिक गरज आहे.समस्येची योग्य समज आणि त्याबबातचा योग्य दृष्टिकोन महत्त्वाचा आहे.डॉ. नीलेश वैद्य यांनी दंत क्षेत्रातील एम. डी. एस.(रुट कॅनल तज्ञ) उच्च पदवी भुषवली असल्याने अवघड शस्त्रक्रिया येथे होतील रुग्णांना नगर,पुणे येथे जाण्याची आवश्यकता नाही.डॉ.वैद्य रुग्णालयामुळे दंत रूग्णांची उणीव पुर्ण होऊन अवघड दंतशस्त्रक्रिया येथे होतील असे मत ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त डॉ.आर.जी.सय्यद यांनी व्यक्त केले.**



पारनेर शहरातील डॉ.वैद्य दातांचा रुग्णालयाचे उद्घाटन डॉ.सय्यद,ह.भ.प.सोपानकाका औटी यांच्या हस्ते पार पडले त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी डॉ.श्रीकांत पठारे, नगरसेवक युवराज पठारे,माजी उपनगराध्यक्ष व नगरसेविका सुरेखा भालेकर, उद्योजक राजु शेख, डॉ.आबासाहेब खोडदे, डॉ.पद्मजा पठारे, डॉ.संदीप औटी, डॉ.सोनिया औटी, डॉ. रोडे, डॉ.पुरकर, रामनाथ वैद्य, अॅड.आनंदा पावडे, माजी प्राचार्य ए.थोरात, खैरे उपस्थित होते.

ह.भ.प.औटी म्हणाले,रूग्णसेवा करताना नेहमी सामाजिक भान जपले जावे आपल्याकडील आलेल्या रुग्णाचे आरोग्य विषयक समाधान डॉक्टर करत असतात.डॉ.वैद्य यांनी रुग्णालयातील विविध सुविधांची माहिती दिली.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com